भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र.४२५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०६/२०१७

**१) घराचे दाराची साखळी तोडुन बेडरु मधील लोखंडी कपाटातील कॅमेरा, मोबाईल, एटीएम कार्ड व नगदी पैश्याची चोरुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०१/०६/२०१७ चे ०२.३० ते ०३.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी लियाकतअली नुर अली सैय्यद वय ४३ वर्ष, रा. नेहा नगर तकीया वार्ड भंडारा हा आपले घरी पहील्या बेडरुम मध्ये झोपला असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन फिर्यादीचे घराचे दुसऱ्या बेडरुमचे दाराची साखळी तोडुन आत प्रवेश करुन बेडरुम मधील लोखंडी कपाटात ठेवलेला १ कॅनोन कंपनीचा कॅमेरा, १ सॅमसंग कंपनीचा जे–२ मोबाईल, एसबीआय बॅकेचा एटीएम, आयडीबीआय बॅकेचा एटीएम व नगदी ८७००/–रु. असा एकुण १८०५०/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कावळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) समोरील दाराचा पितळी कोंडा तोडुन घरातील बेडरुमधील लॅपटॉप, सोन्याचे सिक्के व नगदी पैश्याची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २४/०५/२०१७ चे १७.०० वा ते ०१/०६/२०१७ चे ०८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी महेन्द्र प्यारेलाल मोहबंसी वय ५३ वर्ष, रा. व्यकंटेश कॉलोनी तकीया वार्ड भंडारा यांच्या मालकीचे घर असुन त्या घरामध्ये किरायदार डॉ. मनोहर कांबळे हे आपले परिवारासह भाडयाने राहत असुन ते दि. २४/०५/२०१७ चे सायंकाळी १७.०० वा. दर. घराला ताला लावुन परिवारासह आपले गावी औरगांबाद येथे गेले असतांना कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन समोरील दाराचा पितळी कोंडा तोडुन आत प्रवेश करुन घरातील बेडरुम मधील १ लिनोव्हा कंपनीचा लॅपटॉप, २ सोन्याचे सिक्के ६ सिक्के ६ ग्रॅम, व नगदी ७,०००/–रु. असा एकुण ४७,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे किरायदार सोबत फोन व्दारे संपर्क करुन पो. स्टे. ला येवुन तोंडी रिपोर्ट दिल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मोरे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणावरुन भाजी कापण्याच्या चाकुने पाठीवर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०१/०६/२०१७ चे १०.०० वा. यातील आरोपीची वहीनी दिवसापुर्वी बिमारीने मरण पावली असुन यातील फिर्यादी हा किराणा दुकानात बिडया माचीस घेण्यास जात असतांना यातील आरोपीने फिर्यादीस 'तु माझ्या वहीनीला मारलास' असे म्हणुन आपले जवळील भाजी कापण्याच्या चाकुने पाठीवर मारुन जखमी केल्याने फिर्यादी बळीराम रामाजी कडपते वय ५७ वर्ष, रा. सौदेपुर यांचे व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे. गोबरवाही येथे कलम ३२४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**४) पैश्याचे कारणावरुन भांडण करुन लोखंडी सलाखीने पाठीवर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०१/०६/२०१७ चे १७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी हरी उरकुडा शेन्डे वय ५५ वर्ष, रा. पिपळगांव कोहळी हा हॉटेल मध्ये बसला असतांना यातील आरोपी हा फिर्यादी जवळ जावुन उसने दिलेल्या पैश्याची मागणी केली असता फिर्यादीने त्यास पैसे नंतर देतो असे म्हटले असता आरोपीने भांडण करुन जवळ असलेल्या लोखंडी सलाखीने फिर्यादीचे पाठीवर दोन ठिकाणी मारुन जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे. लाखांदुर येथे कलम ३२४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**५) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकल स्लीप झाल्याने जखमी होवुन स्वतःचे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १८/०५/२०१७ चे १०.३० वा. यातील मृतक आरोपी हा आपले सुझुकी मोटार सायकल क्र. एमएच ३५/०२४० पलाडी ते डोडमाझरी रोडने जात असता आपले ताब्यातील मोटार सायकल लापरवाहीने, हयगयीने चालविल्याने मोटार सायकल ही स्लीप होवुन खाली पडुन जखमी झाल्याने त्यास औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. भोंगाडे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. कारधा येथे कलम २७९,३०४(अ) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मेश्राम पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**६) संगनमत करुन गाई, ढोरे बांधण्याच्या कारणावरुन भांडण करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ३१/०५/२०१७ चे २०.३० वा. दरम्यान यातील मोकाट गाई, ढोरे फिर्यादीचे घराजवळ फिरत असता आरोपी क्र. १ ने फिर्यादीस तुम्ही उभे पाहत आहात मोकाट सुटलेले गाई ढोरे का बांधत नाही असे बोलले असता फिर्यादीने त्याचे गाई ढोरे सुटलेले आहेत ते बांधत बसणार असे बोलल्यावर आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी सोबत भांडण करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन अंगावर धावुन येवुन लाथाबुक्यांने मारपीट करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी राजकुमार सुखदेव भाजीपाले वय ३७ वर्ष, रा. आसगाव यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोस्टे. पवनी येथे कलम २९४,३२३,५०४,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावने पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**७) अल्पवयीन मुलगी घरुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २८/०५/२०१७ चे ९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवीन मुलगी वय १६ वर्ष, ही आपले घरुन मावशीचे घरुन सोनेगाव येथे जाते म्हणुन घरुन निघुन गेली तिचे रिश्तेदारीत शोध घेतले असता मिळुन आले नाही फिर्यादींचे तोंडी व शासनाचे परीपत्रकान्वये पोस्टे. लाखनी येथे कलम ३६३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पठाण पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**८) अवैध देशी दारु/ जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक ०१/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. भंडारा, जवाहरनगर, आंधळगाव, साकोली, पवनी व अडयाळ येथे अवैध देशी दारु/ जुगार अडयावर धाडी घालुन एकुण १४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १६७ लिटर हातभट्टी दारु + १ मोटार सायकल किंमती ३०४५०/–रु. ३५ लिटर २८० मिली लिटर देशी दारु किंमती ७८१८/–रु. तसेच जुगारातुन किंमती १,१५५/–रु. असा एकुण किंमती ३९,४२३/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०१/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३ तीन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोनी. एम. एम. सिडाम
जिवीशा शाखा भंडारा
दुरध्वनी.क्र ८६९८७३३९१९६

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.